**नियमित दिवाणी मुकदमा नं. १३/१९८८ मधील**
**निशाणी १०२ वरील आदेश**
**(गुंडू देसाई वि. रुक्मीणी राणे व.६)**

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार यांनी मयत वादी कै. गुंडू गणेश देसाई यांचे वारसांना वादी म्हणून सामील करुन घेणेकरिता केलेला आहे.

२. अर्जदार यांच्या मते सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील मुळ वादी कै. गुंडू गणेश देसाई हे मयत झालेले आहेत. त्यांचे कायदेशीर वारस म्हणून त्यांची पत्नी अरुणा गुंडू प्रभूदेसाई व मुलगी सौ. ममता व्यंकटेश प्रभूखानोलकर उर्फ शुभांगी गुंडू प्रभूदेसाई या दोघींची नावे मुळ वारस म्हणून दाखल झालेली होती. त्यापैकी श्रीमती अरुणा गुंडू प्रभूदेसाई या दि.२८.०१.२०२३ रोजी मयत झाल्या आहेत व मुळ वादी यांची मुलगी श्रीमती ममता व्यंकटेश प्रभूखानोलकर या दि.२०.१०.२०२३ रोजी निर्वंश मयत झाल्या आहेत. यामध्ये दावा मिळकतीचे मुळ पुरुष नारायण यांना गणेश व वसंत हे दोन मुलगे मयत आहेत. त्यामध्ये गणेश यांना मुळ वादी गुंडू हा मुलगा व त्यांची पत्नी व मुलगी या निर्वंश मयत झालेल्या आहेत. वसंत यांना मधुसुदन हा मुलगा मयत, नारायण, प्रभाकर हा मुलगा मयत, दिनानाथ हा मुलगा मयत असे चार मुलगे आहेत. त्यापैकी नारायण हा मुलगा आज रोजी हयात आहे. यानुसार मधुसुदन यांना एक मुलगा शोभनकुमार व एक मुलगी योजना उर्फ श्वेता ही मुलगी वारस म्हणून आहे. तसेच नारायण यांना अपत्य नाही. तसेच प्रभाकर यांना प्रद्युत हा मुलगा व गिताली ही मुलगी वारस म्हणून आहेत. तसेच दिनानाथ यांना मिनाक्षी व गौरी या दोन मुली आहेत व तन्मय हा मुलगा वारस म्हणून आहेत. त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याचे कामी मयत वादी कै. गुंडू गणेश देसाई यांचे वारस म्हणून सामील करुन तशी दुरुस्ती करणेची परवानगी अर्जदार यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

**३.** प्रतिवादी क्र.१ व २ यांनी निशाणी १०७ वर त्यांचे म्हणणे दाखल करुन अर्जास हरकत नोंदविलेली आहे. त्यांचे कथनाप्रमाणे प्रस्तुतचा अर्जदार यांचा अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रतिवादीस मान्य व कबूल नाही. सदर दाव्यात सन १९८८ पासून दुरुस्त्या केलेल्या नाहीत. वादी नं.२ब या मयत झाल्या याबाबतची जाणीव अर्जदार यांना होती, तरीदेखील त्यांनी मदुतीत त्यांचे वारस रेकॉर्डवर आणलेले नाहीत. तसेच अर्जदार हे वादी नं.२ ब चे कायदेशीर वारस नाहीत. वादी नं.२ब यांचे पती यांनी मे. न्यायालयात अर्ज नं.४/२०२४ कायदेशीर वारस होणेकरिता अर्ज दाखल केलेला आहे. याचा निकाल अजून झालेला नाही. तसेच अर्जदार यांनी वादी नं.२ब यांचे पती यांनी दाखल केलेला अर्ज याकामी नमुद केलेला नाही. सबब, वादी यांच्या वारसांनी दिलेला अर्ज कायदेशीर नाही तरी तो फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.१ व २ यांनी केलेली आहे.

**४.** दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला.

**५.** अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. प्रस्तुतचा दावा वादीने दावा प्रतिवादी यांना कायमची ताकीद व दावा नुकसान भरपाईसाठी दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठयर्थ अर्जदार यांनी त्यांचे प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. अर्जदार यांचे कथनाप्रमाणे ते मयत वादी यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत. परंतु, प्रतिवादी यांनी ते वारस असल्याबाबत हरकत नोंदवलेली आहे. सदर हरकतीचा मुद्दा पहाता अर्जदार हे मयत वादीचे सरळ व कायदेशीर वारस नसलेस त्याबाबत योग्य ती हरकत दाव्याच्या योग्य टप्प्यावर घेण्याचे पूर्ण स्वातंत्र्य प्रतिवादी यांना आहे. तसेच या टप्प्यावर प्रतिवादी यांनी मयत वादी यांचे इतर कायदेशीर वारस असून अर्जदार हे कायदेशीर वारस नसल्याबाबत

कोणताही कागदोपत्री पुरावा आपल्या कथनांच्या पुष्ठयर्थ दिलेला नाही. तसेच प्रतिवादी यांचे कथनाप्रमाणे वादी नं.२ब यांचे पतीने कुडाळ येथील न्यायालयात किरकोळ दिवाणी अर्ज ४/२०२४ अर्ज कायदेशीर वारस होणेकरिता दाखल केलेला आहे. सदरची हरकत पहाता मयत वादी यांचे कायदेशीर वारसांबाबतचा मुद्दा पुराव्याकरिता खुला ठेवून अर्जदार यांना अभिलेखावर वारसदार म्हणून दाखल केलेस योग्य होणार आहे. त्यामुळे प्रस्तुत दाव्यामध्ये सध्यस्थितीमध्ये दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे आदेश XXII नियम ५ प्रमाणे चौकशी करणेची आवश्यकता दिसून येत नाही.  त्याबाबतचा मुद्दा देखील दाव्याच्या गुणदोषावर ठरवण्यात येणारा आहे. तसेच प्रतिवादी यांनी मयत प्रतिवादी नं.६ ते ८, प्रतिवादी नं.३ हे मयत झालेले असून, त्यांची तजवीज याकामी वादी यांनी केलेली नाही, असे कथन केलेले आहे. मुळात मुळ वादी मयत झाल्याने त्यांचे वारस अभिलेखावर आणण्याकरिता अर्जदार यांनी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे. त्यामुळे जोपर्यंत मयत वादीचे कायदेशीर वारस अभिलेखावर येत नाहीत, तोपर्यंत त्यांना दाव्यामध्ये तजवीज करण्याचा अधिकार प्राप्त होत नाही. या कारणाकरिता देखील वादीचे वारस अभिलेखावर येणे जरुरीचे दिसून येते. तसेच, दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी मयत वादी कै. गुंडू गणेश देसाई यांचे अर्जदार हे वारस म्हणून अभिलेखावर घेतलेस प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण त्यांना सदर अर्जदार हे दाव्यात दाखल झाल्यानंतर, त्यांचा उलटतपास व पुरावा देणेचे पुर्ण स्वातंत्र्य आहे. तसेच अर्जदार यांनी निशाणी १०० सोबत मयत अरुणा गुंडू प्रभूदेसाई, ममता व्यंकटेश प्रभुखानोलकर यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. सबब, अर्जदार यांचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी पुढीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

| | **आदेश** |
|---|---|
| **१.** | प्रस्तुतचा अर्ज रक्कम रुपये २००/– खर्चासह मंजुर करणेत येतो. |
| **२.** | अर्जदार यांना सरनाम्यामध्ये निशाणी क्र.१०२ वरील अर्जाप्रमाणे दुरुस्ती करणेची परवानगी देण्यात येते. |
| **३.** | अर्जदार यांनी सदर आदेशाप्रमाणे दाव्यात दुरुस्ती करणेची आहे व दाव्याची दुरुस्त प्रत पुढील तारखेस वा तत्पूर्वी दाखल करावी. |
| **४.** | खर्चाची रक्कम सरकारजमा करणेत यावी. |

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2025.10.15 17:29:20 +0530

दिनांकः –१५/१०/२०२५.

(श्रीम. आर.जी.कुंभार)

ठिकाणः– कुडाळ

अति.सह दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर), कुडाळ.